# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०४/२०१७/ 01919 दिनांक- २८.०४.२०१७

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. प्रदिप ज्ञानदेव मोहरे,<br>प्लॅट नं. ४०४, नंदकुंज अपार्टमेंट,<br>मिलिंद नगर, गौरीपाडा,<br>गौरीपाडा तलावाजवळ,<br>कल्याण (प) - ४२१३०१. |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | २५.०१.२०१७ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | २७.०२.२०१७ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | २७.०३.२०१७ |

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

१. आयोगाच्या कार्यालयातील अवर सचिव पद हे पदोन्नतीने भरले आहे. सदर पद भरण्याकरिता आयोगाची घेतलेली मंजूरीची नस्ती / टिपणी इ.प्रत मिळावी. तसेच सदर अवर सचिव पदास पदोन्नती देताना नस्ती / टिपणी सोबत संबंधित जोडलेली सर्व कागदपत्रे. उदा. कार्यालयाने सादर केलेली संपूर्ण नस्ती / टिपण्या, शासन निर्णय, डिपीसी अहवाल (DPC report) आणि इतर संबंधित असलेले सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Certified Copy) मिळाव्यात.

२. आयोगाने वेळोवळी तयार केलेली अवर सचिव आणि कक्ष अधिकारी संवर्ग पदांची १०० बिंदू नामावलीची प्रत मिळावी. तसेच, सदर १०० बिंदू नामावली शासनास मंजूरीकरिता अथवा माहितीसाठी वेळोवेळी आयोगाच्य कार्यालयाने पाठविलेल्या कार्यालयाची पत्रे आणि त्यापत्रावर शासनाच्या कार्यालयाकडून घेतलेली पोच असलेल्या पत्रांच्या साक्षांकित (सन २००१ ते सन २०१७ पर्यंत) प्रती (Certified Copy) मिळाव्यात.

३. आयोगातील कर्मचारी / अधिकारी संवर्गाची दरवर्षी प्रसिध्द केलेली सेवा ज्येष्ठता यादीच्या (सन २००१ ते २०१७ पर्यंत) साक्षांकित प्रती (Certified Copy) मिळाव्यात.

४. आयोगाची स्थापना ५ ऑगस्ट, १९९९, रोजी झाली आहे. त्यानुसार कार्यालयातील अवर सचिव पद किती वेळा भरले व कोणत्या संवर्गातून भरले त्याची बिंदू नामावली, ज्येष्ठता सूची आणि वर्तमान पत्रात जाहिरात दिली असल्यास त्याची साक्षांकित (Certified Copy) प्रत मिळावी.

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

आपला दि. २५.०१.२०१७ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २५.०१.२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.-

१. आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्तऐवजामध्ये एकूण १३२ पृष्ठे आहेत)

२. आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्तऐवजामध्ये एकूण ८ पृष्ठे आहेत)

३. आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्ताऐवजामध्ये एकूण १५ पृष्ठे आहेत)

४. आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्तऐवजामध्ये एकूण २१ पृष्ठे आहेत)

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

१) माहितीचा अधिकार अर्ज मुद्दा अ मधील मागितलेली माहिती मला अपूर्ण पुरविलेली आहे. तसेच सदर माहिती सन २००१ ते २०१० च्या कालावधीतील माहिती देण्यात आलेली नाही.

२) सेवा ज्येष्ठता यादी (सन २००१ ते २०१५ पर्यंत) ची माहिती न देता सन २०१६ या वर्षातील माहिती देण्यात आलेली आहे. सन २०१६ पूर्वीची सेवा ज्येष्ठता यादी देण्यात आलेली नाही. सदर माहिती अपूर्ण दिलेली आहे.

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत) :-**

वरील अपीलात विशेष तत्वाने नमुद करण्यात येते की, सदर अपील ही कार्यालयातील माहिती अधिकारी /कक्ष अधिकारी श्री प्रदीप मोहरे यांनी केले असल्याने या अपीलात मानीव जन माहिती अधिकारी , उपसंचालक ( प्रशासनात आणि वित्त) श्री प्रशांत भांगरे हे आहेत. संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. १२.०४.२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी तसेच मानीव जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले.

**अपिलार्थी यांनी केलेले लेखी निवेदन खालील प्रमाणे आहे :-**

सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेस अनुसरून मी मा. अपिलीय अधिकारी यांना काही खालील बाबी निर्दशनास आणू इच्छितो. सन २००१ ते २०१७ पर्यत अद्यावत असलेली १०० बिंदू नामावलीची रजिस्टर नोंद असलेल्या प्रती उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. यासंदर्भात श्री प्रशांत भांगरे, मानीव जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल सुनावणी दरम्यान असे सांगितले की, आयोगाच्या कार्यालयात एकाच संवर्गातील ३२ पदे नसल्यामुळे आयोगाच्या कार्यालयास बिंदू नामावलीची आवश्यकता नाही व त्या संदर्भात त्यांनी २००९ सालातील शासन निर्णयाची प्रत दाखविली. परंतू यावर माझे म्हणणे असे आहे की, जर आयोगास अथवा शासनात अशा प्रकारची बिंदू नामावली अद्यावत ठेवू नये असे लेखी शासन निर्णय किंवा परिपत्रकाची प्रत असेल तर त्याची प्रत उपलब्ध करून द्यावी, विनंती.

तसेच माझे म्हणणे असेही आहे की, शासनाच्या कार्यालयात १०० बिंदू नामावली नोंदवही मध्ये ठेवण्याची पध्दत आहे. तशी आयोगाच्य कार्यालयात उपलब्ध असलेली बिंदू नामवली पदाची रजिस्टर नोंद असलेली नोंदवहितील प्रत देण्यात आलेली नाही. यावर मानीव जन माहिती आधिकारी आणि त्यांच्या सोबत असलेले श्री अरूण वाळुंज यांनी सांगितले की, सदर नोंद असलेले रजिस्टर मंत्रालयात पाठविलेले आहेत, तर मानीव जन माहिती आधिकारी यांनी असे का सांगितले की, बिंदू नामावली आयोगाच्या कार्यालयात लागू नाही. तसेच मी आयोगातील कर्मचारी/अधिकारी संर्वगाची दरवर्षी प्रसिध्द केलेली सेवा ज्येष्ठता यादीच्या फक्त सन २०११ आणि सन २०१६ ची ज्येष्ठता यादीची प्रत दिलेली आहे. सन २००१ ते २०१० आणि सन २०१२ ते २०१५ तसेच २०१७ या कालावधीतील ज्येष्ठता यादी प्रत दिलेली नाही.

**<u>मानवी जन माहिति अधिकारी यांनी लेखी केलेले निवेदन खालील प्रमाणे आहे :-</u>**

उपरोक्त विषयान्वये श्री.प्रदिप मोहरे यांनी केलेल्या प्रथम अपिलीय अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.०४.२०१७ रोजी पार पाडलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अर्जदाराने मागविलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेले अभिलेखे अर्जदारास उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सदर अभिलेखे सुनावणीच्या दरम्यान आपणासही दाखविण्यात आलेले आहेत.

या अपिलात प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपीलार्थी यांना मानवी जन माहिति अधिकारी यांनी अपिलार्थीचा मुद्दा क्र-१ ते ४ यांस आयोगाच्या कार्यलयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार माहिती / दस्ताऐवज उपलब्ध करून दिलेले आहे.

अपिलार्थी यांनी मागणी केलेले दस्तऐवज / माहिती हि अपूर्ण असल्याचे त्यांचे अपीलात नमूद केले आहे. अपीलार्थी यांनी सन २००१ ते २०१० च्या कालवधीतील माहिती देण्यात आलेली नाही तसेच सेवा जेष्ठता यादी सन २००१ ते २०१५ पर्यंतची न देता सन २०१६ या वर्षाचीच दिलेली आहे व ती अपूर्ण माहिती आहे असे नमूद केले आहे.

या प्रकरणी कार्यालयातील उपलब्ध माहिती, अपिलार्थी यांना मानीव जन माहिती अधिकारी यांना पूरविलेली आहे व दस्तऐवज उपलब्ध करून दिलेले आहे. करिता मानीव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिल्याचे संकृत दर्शनी दिसून येते.

दि. १७.०४.२०१७ च्या अपीलार्थीच्या निवेदनातील माहिती उपलब्ध करून दयावी या विषयी असे नमूद करण्यात येते की वरील माहिती हि अपीलार्थी यांच्या मूळ माहिती अर्जात मागितली नाही. करिता ते याकरिता स्वतंत्र अर्ज करू शकतात. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**<u>निर्णय</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(अनिलकुमार उके)

**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**

**प्रत- मानीव जनमाहिती अधिकारी, मविनिआ.**